# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्रशिक्षण विभाग

शासन परिपत्रक क्रमांक रसुअ-२०११/प्र.क्र. १८७/२०११/समन्वय,
दिनांक :-२.१२.२०११

केंद्र शासनाच्या निदेशानुसार, दरवर्षी जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात रस्ता सुरक्षा सप्ताह राबविण्यात येतो. गतवर्षी राज्यामध्ये रस्ता सुरक्षा अभियान पंधरवडा राबविण्यात आला. **यावर्षीसुद्धा संपूर्ण राज्यामध्ये दिनांक १.१.२०१२ ते दिनांक १५.१.२०१२ या कालावधीमध्ये रस्ता सुरक्षा अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

महाराष्ट्र राज्य हे देशातील सर्वाधिक प्रगत व उद्यमशिल राज्य आहे. देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील औद्योगिक क्षमता व पायाभूत सुविधांचा जास्त विकास झालेला आहे. राज्यामध्ये राज्य व राष्ट्रीय महामार्गाची एकूण लांबी ३७,५८२ कि.मी. आहे. राज्यातील रस्त्यांच्या विस्तारित जाळ्याबरोबरच, राज्यात होणाऱ्या अपघातांची संख्याही फार मोठी आहे. दरवर्षी संपूर्ण राज्यात सरासरी ७५,००० अपघात होतात व त्यामध्ये सरासरी १२००० लोक मृत्यूमुखी पडतात तर सुमारे २५००० लोक गंभीररित्या जखमी होतात. अपघातात मोठ्याप्रमाणात होणारी जिवीत व मालमत्तेची हानी लक्षात घेऊन, अपघातांना नियंत्रित करण्यासाठी शासनस्तरावरुन विविध स्तरावरुन अनेक प्रयत्न केले जातात. **रस्ता सुरक्षा अभियान** हा त्यापैकीच एक प्रयत्न आहे. वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कसुरदारांवर कारवाई करण्याबरोबरच, वाहतूक नियमांची व्यापक प्रसिद्धी करणे, सुरक्षित प्रवासाचे महत्त्व अधोरेखित करणे इत्यादी बाबींची व्यापक जनजागृती मोहिम राबविणे हा या अभियानाचा एक भाग आहे.

**महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना** वाहतुकीच्या नियमांची जाणीव करुन देणे, वाहतुक सुरक्षेचे महत्त्व पटवून देणे व आजचा विद्यार्थी उद्याचा वाहनचालक असू शकतो हे लक्षात घेऊन त्यांना जागरुक व संवेदनशील नागरिक बनविण्याच्यादृष्टीने, **रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत सामील करुन घेण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.** सबब, रस्ता सुरक्षा अभियान पंधरावड्यादरम्यान, महाविद्यालयीन स्तरावर जनजागृतीकरिता खालील उपक्रम राबविण्याचे शासनाचे आदेश आहेत.

- महाविद्यालयांमध्ये वाहतुकीचे नियम व सुरक्षिततेच्यादृष्टीने **चर्चासत्रे भरविणे / व्याख्यानमाला / परिसंवादांचे आयोजन करण्यात यावे.**

पत्र प्राप्त झाले

☛ महाविद्यालयीन स्तरावर खालील विषयांवर वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात

१. वाहतूक पोलीस : समज / गैरसमज,

२. मोटार वाहन कायदा : सद्यस्थितीत पुरेसा आहे की सुधारण्याची आवश्यकता आहे,

३. अपघातग्रस्तांना मदत : करावी की करु नये

☛ **राष्ट्रीय सेवा योजना (NSS) च्या आगामी शिबीर / कार्यक्रमामध्ये, वाहतुक आणि सुरक्षिततेच्या अनुषंगाने परिसंवाद / चर्चासत्र आयोजित करण्यात यावेत.**

☛ शैक्षणिक संस्थांच्या परिसरातील रस्त्यांवर अनिवार्य असणारे **झेब्रा क्रॉसिंग पट्टे / वेग नियंत्रक (स्पीड ब्रेकर ) / वाहतुक नियंत्रक सूचनादर्शक फलक** योग्यप्रकारे आहेत किंवा नाही याची तपासणी संस्थाप्रमुखांनी करुन, आवश्यकतेनुसार परिवहन (गृह) विभागाच्या स्थानिक पातळीवरील संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करुन, त्याबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

वरील आदेश / कार्यक्रम सर्व संबंधितानी / संचालकांनी त्यांचे अधिनस्त शासकीय / निमशासकीय / खाजगी शैक्षणिक संस्थांचे निदर्शनास आणून शासन आदेशाचे पालन करुन घेण्यात यावे. तसेच समाजप्रबोधनाच्यादृष्टीने परिवहन विभागाकडून अन्य काही कार्यक्रम हाती घेतले गेल्यास, त्यास सक्रीय मदत करण्यात यावी व **राज्य रस्ता सुरक्षा अभियान यशस्वी करण्यात सक्रीय हातभार लावावा.**

**( संजय कुमार )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

**सर्व सहसचिव / उपसचिव**, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
**राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी /राष्ट्रीय सेवा योजना**, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
**सर्व अकृषिक विद्यापीठांचे कुलसचिव**, महाराष्ट्र राज्य,
**आयुक्त** (व्यवसाय प्रशिक्षण), **संचालक** (उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / व्यवसायशिक्षण / कला / ग्रंथालय),
गृह विभाग /पोल-८,
निवडनस्ती.

**प्रत माहितीस्तव :**

**मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव**
**मा. प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे स्वीय सहायक.**

(सोबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे **''राज्य रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत कार्यक्रम''** या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक रसुअ—२०११/प्रक्र.१८७/२०११/समन्वय,दिनांक २.१२.२०११ ची प्रत सोबत जोडत आहे.)

---

पृ.क्र.तंशिसं/प्राकाना/शैवि/२०१२/48
दिनांक :— 4 JAN 2012

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय अनुदानित/विनाअनुदानित
तंत्रनिकेतने/फार्मसी/एचएमसीटी(पदविका),
अभियांत्रिकी/फार्मसी/एचएमसीटी/आर्किटेक्चर(पदवी),
तसेच एमबीए/एमसीए/पीजीडीएम (पदव्युत्तर पदवी)

त्यांना कळविण्यात येते की, सोबतच्या शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

प्रत :— प्रोग्रामर, हेच कार्यालय यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.